भारत सरकार

विधि, न्याय व कंपनी कार्य मंत्रालय

सत्यमेव जयते

# संपदा शुल्क (वाटप) अधिनियम, १९६२

## (१९६२ चा अधिनियम क्रमांक ९)

[१ ऑक्टोबर, १९७७ रोजी अंमलात असल्याप्रमाणे]

# The Estate Duty (Distribution) Act, 1962

## (Act No. 9 of 1962)

[*As in force on 1st October, 1977*]

संचालक, मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र शासन यांनी भारत सरकारच्या वतीने मुद्रित व प्रकाशित केले.

( १९७८ )

किंमत ४० पैसे

# संपदा शुल्क (वाटप) अधिनियम, १९६२

## कलमांचा क्रम

कलमे.

१. संक्षिप्त नाव.

२. व्याख्या.

३. राज्यांना संपदा शुल्काच्या नेमून दिलेल्या निव्वळ उत्पन्नाचे वाटप.

४. नियम करण्याची शक्ती.

(शा.म.मु.) एच ४८२८ (१,०५५—९-७८)

# संपदा शुल्क (वाटप) अधिनियम, १९६२
## (१९६२ चा अधिनियम क्रमांक ९)

[३० मार्च, १९६२]

संपदा शुल्काच्या निव्वळ उत्पन्नाचे, वित्त आयोगाने आपल्या [1][२८ ऑक्टोबर, १९७३] रोजीच्या अहवालामध्ये सूत्रबद्ध केलेल्या तत्त्वांच्या आणि केलेल्या शिफारशींच्या अनुरोधाने राज्यांमध्ये वाटप करण्याचा उपबंध करण्याकरिता अधिनियम.

भारतीय गणराज्याच्या तेराव्या वर्षी संसदेद्वारे पुढीलप्रमाणे अधिनियमित होवो :–

संक्षिप्त नाव. १. या अधिनियमास 'संपदा शुल्क (वाटप) अधिनियम, १९६२' असे म्हणता येईल.

व्याख्या. २. या अधिनियमामध्ये—

(क) "संपदा शुल्क" याचा अर्थ, शेतजमिनीहून अन्य संपत्तीच्या संबंधात 'संपदा शुल्क अधिनियम, १९५३' (१९५३ चा ३४) याखाली बसवण्यात आलेले संपदा शुल्क असा आहे ;

(ख) "राज्य" यामध्ये संघ राज्यक्षेत्राचा समावेश होत नाही.

राज्यांना संपदा शुल्काच्या नेमून दिलेल्या निव्वळ उत्पन्नाचे वाटप. ३. (१) [2][१ एप्रिल, १९७४] या दिनांकी व त्यानंतर सुरू होणाऱ्या प्रत्येक वित्तीय वर्षामध्ये, त्या वित्तीय वर्षात बसवलेल्या आणि उगराणी केलेल्या संपदा शुल्काचे निव्वळ उत्पन्न, त्यातून उक्त उत्पन्नाच्या [3][२.५] टक्क्यांइतकी रक्कम संघ राज्यक्षेत्रांशी संबंधनीय म्हणून वजा केल्यानंतर, पोटकलम (२) च्या उपबंधांनुसार राज्यांमध्ये वाटून देण्यात येईल.

[4]* * * * *

(२) पोटकलम (१) खाली कोणत्याही वित्तीय वर्षामध्ये वाटपासाठी उपलब्ध होणाऱ्या एकूण रकमेपैकी—

(क) स्थावर संपत्तीशी संबंधनीय असलेली रक्कम, त्या त्या राज्यांमध्ये असलेल्या स्थावर संपत्तीचे, त्या वित्तीय वर्षाच्या संबंधात निश्चित केलेले जे ठोक मूल्य असेल, त्याच्या प्रमाणात राज्यांमध्ये वाटून दिली जाईल;

[5][(ख) शिल्लक रक्कम राज्यांमध्ये पुढीलप्रमाणे वाटून दिली जाईल :—

| राज्य | टक्केवारी |
|---|---|
| आंध्र प्रदेश .. .. .. .. .. | ८·०४ |
| आसाम .. .. .. .. .. | २·७० |
| बिहार .. .. .. .. .. .. | १०·४१ |
| गुजराथ .. .. .. .. .. | ४·९३ |
| हरयाणा .. .. .. .. .. | १·८६ |
| हिमाचल प्रदेश .. .. .. .. .. | ०·६४ |
| जम्मू आणि काश्मीर .. .. .. .. .. | ०·८५ |
| कर्नाटक .. .. .. .. .. | ५·४१ |
| केरळ .. .. .. .. .. .. | ३·९४ |
| मध्य प्रदेश .. .. .. .. .. | ७·७० |
| महाराष्ट्र .. .. .. .. .. | ९·३१ |
| मणिपूर .. .. .. .. .. | ०·२० |
| मेघालय .. .. .. .. .. | ०·१९ |
| नागालँड .. .. .. .. .. | ०·१० |
| ओरिसा .. .. .. .. .. | ४·०५ |
| पंजाब .. .. .. .. .. .. | २·५० |
| राजस्थान .. .. .. .. .. | ४·७६ |
| तामीळनाडू .. .. .. .. .. | ७·६१ |
| त्रिपुरा .. .. .. .. .. | ०·२९ |
| उत्तर प्रदेश .. .. .. .. .. | १६·३२ |
| पश्चिम बंगाल .. .. .. .. .. | ८·१९] |

१. 'संपदा शुल्क (वाटप) विशोधन अधिनियम, १९७४' (१९७४ चा २१)-कलम २ द्वारे मूळ मजकुराऐवजी घातले.
२. कित्ता-कलम ३ (एक) (क) द्वारे मूळ मजकुराऐवजी घातले.
३. कित्ता-कलम ३ (एक) (ख) द्वारे मूळ मजकुराऐवजी घातले.
४. कित्ता-कलम ३ (एक) (ग) द्वारे परंतुक व तक्ता गाळला.
५. कित्ता-कलम ३ (दोन) द्वारे मूळ खंड (ख) ऐवजी घातले.

(३) या कलमाच्या प्रयोजनार्थ,—

(क) "स्थावर संपत्तीशी संबंधनीय रक्कम" याचा अर्थ, ज्या रकमेचे पोटकलम (१) खाली कोणत्याही वित्तीय वर्षामध्ये वाटून देण्यायोग्य रकमेशी असलेले प्रमाण हे, त्या वित्तीय वर्षाच्या संबंधात निश्चित केल्याप्रमाणे त्या राज्यांमध्ये असलेल्या सर्व स्थावर संपत्तीच्या ठोक मूल्याचे, याप्रमाणे तेथे असलेल्या सर्व स्थावर व जंगम संपत्तीच्या ठोक मूल्याशी असणाऱ्या प्रमाणाइतके असेल ती रक्कम असा आहे;

(ख) "ठोक मूल्य" याचा स्थावर किंवा जंगम संपत्तीच्या संबंधातील अर्थ, एखाद्या व्यक्तीच्या मृत्यूनंतर संक्रामित होणाऱ्या सर्व जंगम संपत्तीचे किंवा, प्रकरणपरत्वे, सर्व स्थावर संपत्तीचे 'संपदा शुल्क अधिनियम, १९५३' (१९५३ चा ३४) याखाली नियंत्रकाने ठरवल्याप्रमाणे एकूण मूल्य असा आहे;

(ग) "स्थावर संपत्ती" यामध्ये शेतजमिनीचा समावेश होत नाही.

नियम करण्याची शक्ती. ४. (१) कोणत्या पद्धतीने संपत्तीचे ठोक मूल्य परिगणना करून ठरवावयाचे त्यासंबंधी, या अधिनियमाखाली करावयाचे कोणतेही भरणे कोणत्या वेळी आणि कोणत्या पद्धतीने करावयाचे त्यासंबंधी, एका वित्तीय वर्षाचे दुसऱ्या वित्तीय वर्षाशी समायोजन करण्यासंबंधी आणि अन्य कोणत्याही आनुषंगिक किंवा सहाय्यभूत बाबींसंबंधी उपबंध करण्याकरिता केंद्र शासनास शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे नियम करता येतील.

(२) या कलमाखाली केलेला प्रत्येक नियम, तो करण्यात आल्यानंतर होईल तितक्या लवकर संसदेच्या प्रत्येक सभागृहासमोर ते [1][एक सत्राने किंवा दोन किंवा अधिक क्रमवर्ती सत्रे मिळून] बनलेल्या अशा एकूण तीस दिवसांच्या कालावधीत सत्रासीन असताना ठेवला जाईल [2][आणि पूर्वोक्त सत्राच्या पाठोपाठचे सत्र संपण्यापूर्वी जर] त्या नियमात कोणतेही आपरिवर्तन करण्याबाबत दोन्ही सभागृहांचे मतैक्य झाले किंवा तो नियम करण्यात येऊ नये याबाबत दोन्ही सभागृहांचे मतैक्य झाले तर, तो नियम त्यानंतर अशा आपरिवर्तित रूपातच परिणामक होईल किंवा, प्रकरणपरत्वे, मुळीच परिणामक होणार नाही; तथापि, अशा कोणत्याही आपरिवर्तनामुळे किंवा शून्यीकरणामुळे, तत्पूर्वी त्या नियमाखाली करण्यात आलेल्या कोणत्याही गोष्टीच्या विधिग्राह्यतेस बाध येणार नाही.

---

## THE ESTATE DUTY (DISTRIBUTION) ACT, 1962

### संपदा शुल्क (वाटप) अधिनियम, १९६२

### इंग्रजी-मराठी शब्दसूची

| | | |
|---|---|---|
| amount attributable to immovable property | स्थावर संपत्तीशी संबंधनीय रक्कम | [S. 3(3) (a)] |
| estate duty | संपदा शुल्क | [S. 2(a)] |
| formulate | सूत्रबद्ध करणे | [long title] |
| gross value | ठोक मूल्य | [S. 3(3) (b)] |
| net proceeds | निव्वळ उत्पन्न | [long title] |

---

### संपदा शुल्क (वाटप) अधिनियम, १९६२

## THE ESTATE DUTY (DISTRIBUTION) ACT, 1962

### मराठी-इंग्रजी शब्दसूची

| | | |
|---|---|---|
| ठोक मूल्य | gross value | [S. 3(3) (b)] |
| निव्वळ उत्पन्न | net proceeds | [long title] |
| संपदा शुल्क | estate duty | [S. 2 (a)] |
| सूत्रबद्ध करणे | formulate | [long title] |
| स्थावर संपत्तीशी संबंधनीय रक्कम | amount attributable to immovable property | [S. 3(3) (a)] |

१. 'संपदा शुल्क (वाटप) विशोधन अधिनियम, १९७४' (१९७४ चा २१)-कलम ४ द्वारे मूळ मजकुराऐवजी घातले.

२. कित्ता–कलम ४ द्वारे मूळ मजकुराऐवजी घातले.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई